# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 15.03.2019 शुक्रवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे. लकडगंज – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 14.03.2019 चे 1230 वा ते 1300 वा दरम्यान फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी पन्ना चरण शाहु, याने पो.स्टे. लकडगंज हद्यीतील कॉलेज जवळून फुस लावून कायदेशीर रखवालीतून पळवून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. लकडगंज येथे सपोउपनि ॲन्थोनी, 8554932542 यांनी आरोपीविरूध्द कलम 363 भादंवि सहकलम 8 बालकाचे लैगीक अपराध संरक्षण अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

### (अकस्मात मृत्यू)

**पो.स्टे तहसील, शांतीनगर :**

**1) तहसील** – दिनांक 13.03.2019 चे 1500 वा चे सुमारास ईश्वर मारूती गजभीये, वय 60 वर्ष, रा. आजरी माजरी, प्लॉट नं. 63, यशोधरानगर, नागपूर यांना उपचाराकरीता पो.स्टे. तहसील हद्यीत मेयो हॉस्पीटल अपघात विभाग येथे आणले असता ते लघुशंकेकरीता बाथरूममध्ये गेले असता तेथे त्यांचा पाय स्लीप होवून खाली पडले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल वार्ड नं. 4 येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 14.03.2019 चे 1830 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे तहसील येथे मसपोनि थोरात, 9552543556 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**2) शांतीनगर** – दिनांक 07.03.2019 चे 1430 वा चे सुमारास पो.स्टे. शांतीनगर हद्यीत लालगंज पाण्याचे टाकीजवळ, नागपूर येथे राहणारे अशोक नारायणराव हिंगुरकर, वय 49 वर्ष, हे झोपले असता उठले नाही. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 15.03.2019 चे 1240 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. शांतीनगर येथे मपोउपनि कुरसंगे, 7218265300 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

### (ईतर)

**1) गुन्हे शाखा युनीट क्र. 3 ची कामगीरी – कराड सातारा येथील बॅक ऑफ महाराष्ट्र येथे सशस्त्र दरोडा टाकणा–या आरोपीतांपैकी दोन आरोपींना अटक केल्याबाबत :**

दिनांक 11.03.2019 चे 1600 वा चे सुमारास कराड तालुक्यात असलेल्या बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा शेणोली तह. कराड, जि. सातारा, येथे 5 चोरटयांनी रिव्हाल्वर मधून फायर करून रिव्हाल्वरचा धाक दाखवून फिर्यादी अमोल गोवर्धन शिंदे, वय 33 वर्ष, रा. माउली, पार्क, कराड, (शाखा व्यवस्थापक) व साक्षीदारा यांना मारहान करून तसेच स्ट्रॉग रूममध्ये कोंडून ठेवून बॅकेतील 23,20,000 रू, सोन्याचे दागीने व इतर साहीत्य असा एकुण 32,26,375 रू चा माल दिवसाढवळया धडसी दरोडा

टाकून चोरून नेला. फिर्यादीचे वरून कराड तालुका पोलीस स्टेशन जि. सातारा येथे कलम 395,397,400 भादंवि सहकलम 3/25 भाहका, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद गंभीर गुन्हा घडल्यानंतर संपुर्ण महाराष्ट्रातील पोलीस यंत्रणा यातील दरोडा टाकणारे आरोपीतांचा कसून शोध घेत होती नमुद घटना संदर्भाने गुन्हे शाखा नागपूर शहर युनीट क्र. 3 ला यातील काही आरोपी हे सोलापूर येथून खाजगी वाहनाने नागपूर येथे येत असल्याची विश्वसनीय गुप्त माहीती प्राप्त झाली. मा. श्री निलेश भरणे, पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे विविध पथक तयार करण्यात आले. पहाटे 0400 वाजता पासून अन्य शहरातून नागपूर शहर हद्यीत येणारे महामार्गावर पोलीसांनी सापळा रचून खाजगी वाहने विशेषतः बसेस ची तपासनी सुरू केली. युनीट क्र. 3 मधील अधिकारी कर्मचारी यांनी अतीशय मेहनत घेवून वर्धा मार्गावरील खापरी नाका येथे खुराणा ट्रॅव्हस ची बस क्र एमएच/38/एफ/8019 ही खाजगी बस थांबवून त्यामधून आरोपी क्र. 1) श्रवणकुमार ब्रिजनंदन प्रसाद यादव, वय 24 वर्ष, रा. जमालुद्दिन चक, रेल प्लांटजवळ, प्लॉट नं. 7, दानापुर, जि. पटना (बिहार), 2) अभिषेककुमार रणजित सिंग, वय 20 वर्ष, रा. नेवरा कॉलनी, खवल, दानापूर, जि. पटना (बिहार), यांना दरोडयातील नगदी 6,19,500 रू व इतर साहीत्य असा एकुण 6,31,200 रू चा मुद्येमालसह ताब्यात घेवून नमुद गंभीर गुन्हा उघडकीस आणला. दोन्ही आरोपी हे बिहार येथील आंतरराज्य टोळीचे सदस्य असल्याचे संशय असून त्याअनुषंगाने तपास सुरू आहे. आरोपीबाबात कराड तालुका पोलीसांना माहिती देण्यात आली असून दोन्ही आरोपीतांकडे अधिक तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) श्री निलेश भरणे, मा. सहा पोलीस आयुक्त, सुधिर नंदनवार, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि नरेद्र हिवरे, सपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, गोरख कुंभार, चंद्रकांत माळी (कराड तालुका, जि. सातारा), पोउपनि नितेश डोर्लीकर हेमंत थोरात, सपोउपनि श्रीनिवास मिश्रा, राजकुमार देशमुख, राजेंद्र बघेल, राजेंद्र सेंगर, शेख फिरोज, शेख शरीफ, पोहवा सुरेश हिंगणेकर, अनिल दुबे, विठ्ठल नासरे, नापोशि रवि बारई, अमीत पात्रे, अतुल दवंडे, शाम कडू, पोशि राहुल इंगोले, संदीप मावलकर, यांनी केली आहे.



2) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कार्यवाही –

दिनांक 15/03/19 चे 14/00 वा चे सुमारास गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पो.स्टे. पाचपावली येथील टेका, चिराग अली चौक, बिसमिल्ला नगर, पाचपावली, नागपुर येथे गोवंश कापत आहे अश्या माहीतीवरुन कलीम कुरेशी यांचे घरासमोर पंचासमक्ष रेड केली असता यातील आरोपीत ईसम हे गोवंश कत्तल करताना मिळून आले. त्याची नामे आरोपी 1) शेख रज्जाक वल्द शेख रहमान कुरेशी वय 45 वर्षे रा. महेन्द्र नगर,पाण्याची टाकीजवळ, स्वतःचे झोपडे, पाचपावली, नागपुर 2) शेख नाजीम वल्द शेख सुभान कुरेशी वय 30 वर्षे, रा. मालीखेल, कुरेशी मोहल्ला, जळगाव (जामोद) जि. बुलढाणा 3) शेख शाहीद वल्द शेख मोबीन कुरेशी, रा. पिली नदी, भंते आंनद कौशल्या नगर, स्वतःचे

झोपडे, जरिपटका,नागपुर यांना ताब्यात घेण्यात आले तसेच फरार आरोपी नामे 4) माजीद मेमन हाजी रा. टेका नवी वस्ती, पाचपावली यांचे शोध कामी तपास पथक रवाना करण्यात आले आहे.

नमुद आरोपीतांन कडून एक लोखंडी सत्तुर कि.अं. 300/– रु.,एक लोखंडी कोयते कि.अं. 200/– रु., एक लाकडी मुठ असलेला लोखंडी रॉड कि.अं. 100/– रु. तसेच एक लोखंडी इलेक्ट्रॉनिक वजन काटा कि.अं. 10,000/– रु. व तसेच घटनास्थळावरुन कापलेला गोमास अंदाजे 150 किलो प्रति किलो 150/– रु .प्रमाणे 22,500/– रु. चा गोमासाचा मुददेमाल व एकुण 05 गोवंश यांना त्यांचे नाकाला व तोडांला नॉयलान दोरीने बांधुन ठेवल्याने त्याच्या तोडांतुन लाळ पडत होते ते गोवंश अचेत अवस्थेत होते. सदर गोवंश प्रती कि.अं. 20,000/– रु प्रमाणे 1,00,000/– रु. चे जप्त करण्यात आले. तसेच सदर घटनास्थळावरुन एक बजाज पल्सर गाडी कं. एम.एच/49/ए.सी./2020 कि.अं. 90,000/– रु.सदर घटनास्थळावरुन एकुण 2,23,100/– रु.चा मुददेमाल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरुध्द पो.स्टे. पाचपावली येथे अप.क. 215/19 कलम 5(अ),5(ब),(ब),9(अ),(ब) गोवंश हत्या बंदी सुधारणा अधि.सह क.3,9,11 प्राण्याना कृरतेने वागविण्यास प्रतीबंध करण्याबाबत अधि.1960 प्रमाने सहकलम 4(4) फुड सेप्टी कायदा,सहकलम 268 भा.दं.वि. प्रमाणे दाखल करुन अटक करण्यात आली

वरील प्रमाणे कारवाई करुन एकुण 3 आरोपीतानां अटक करुन एकुण 2 लाख 23 हजार 100 रुपयेचा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. व फरार आरोपीचा शोध सुरु आहे.

सदरची कार्यवाही ही मा.श्री. राहुल माकनीकर, पोलीस उप आयुक्त, परि.क्र. 3, श्री. वालचंद मुंडे सहा.पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग यांचे मार्गदर्शनात पो.स्टे. पाचपावलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मेश्राम, पो.नि. गुन्हे, जाधव, सपोनि. सुरोसे, पो.उपनि .शिसोदे, रामटेके, पो.हवा. रामेश्वर कोहळे, चितामंण डाखोळे, राजकुमार शर्मा, संतोष ठाकुर, नापोशि शैलेश चौधरी, विजय लांडे, विनोद बर्डे, विश्वास बलादे, आणि पो.स्टे.पाचपावलीचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी केली आहे.




3) पो.स्टे. गणेशपेठ पोलीसांची कामगीरी –

फिर्यादी गगन पंचमलाल बंसकार वय 19 वर्ष, रा कबीर वार्ड शिवनी मध्य प्रदेश यांनी आपली बजाज पल्सर गाडी क्र. एम.पी/22/एम.एच/8981 ही दि. 07/11/18 चे 08:15 वा. दोसर भवन चौक येथील सरस्वती विद्यालय जवळ पार्क करून ठेवुन काही कामानिमीत्त बाजुला गेले. काही वेळाने काम आटोपुन फिर्यादी हे गाडी पार्क केलेल्या ठिकाणी आले असता गाडी दिसुन आली नाही. गाडी कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. गणेशपेठ येथे गुन्हा कलम 379 भादवी प्रमाणे दाखल करण्यात आला.

नमुद गुन्हयाचे तपासा दरम्यान यातील आरोपी नामे आकाश सुभाष तोटे, वय 22 वर्ष, रा लालगंज बारईपुरा, हनुमान मंदिर जवळ, पो.स्टे. शांतीनगर, नागपूर याचा शोध घेवुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरी केलेले वाहन क्र. एम.पी/22/एम.एच/8981 कि.अ. 30,000/– रू अशी दोन पंचासमक्ष जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त करून ताब्यात घेतले. तसेच आरोपीस दाखल गुन्हयात अटक करण्यात आली. पुढील कारवाई करीत आहे.

सदरची कामगीरी मा.श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त परि.क्र.3 नागपुर शहर, मा.श्री. राजरतन बनसोड सहा.पोलीस आयुक्त, कोतवाली विभाग नागपूर, यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.

सुनिल गांगुर्डे, पोहवा, पंकज बोराटे, नापोशि हेमंत लोणारे, सुनित गुजर, अजय गिरडकर व पोशि उमाकांत नागदेवे, हितेश राठोड यांनी पार पाडली.




4) भरोसा सेल, नागपूर शहर येथे व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे आयोजन केल्याबाबत –

सन 2017 ते आजपर्यंत भरोसा सेल, नागपुर शहर येथे एकुण 4626 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आजपर्यंत 1761 तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे. सदर तक्रारीचे समुपदेशना दरम्यान बहुतांश कुटुंब हे दारुचे व इतर व्यसनामुळे त्रस्त असल्याचे दिसुन आले आहेत त्यामुळे त्यांना व्यसनापासुन परावृत्त करणेकरिता व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे माध्यमातुन समुपदेषन करणे आवष्यक आहे.

त्या अनुशंगाने दिनांक 15.03.2019 रोजी 16.00 ते 18.00 वा. पर्यंत भरोसा सेल कार्यालय, नागपुर शहर येथे ''**व्यसनमुक्ती**'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास मैत्रि व्यसनमुक्ती केंद्र, हिंगणा रोड, नागपुर चे प्रकल्प संचालक, श्री. रवि पाध्ये व समुपदेशक श्री तुषार नातु हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रमांचे प्रास्ताविक मपोउपनि संगिता किल्लेकर भरोसा सेल, नागपुर यांनी करुन भरोसा सेलच्या कामगिरीचा आढावा घेतला. तसेच समुपदेषक श्रीमती छाया जोशी यांनी सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

या समारंभामध्ये मैत्रि व्यसनमुक्ती केंद्र, हिंगणा रोड, नागपुर चे प्रकल्प संचालक, श्री. रवि पाध्ये व समुपदेषक श्री तुषार नातु यांनी उपस्थित राहुन त्यांचे फुल देवुन स्वागत करण्यात आले श्री. रवि पाध्ये यांनी दारु हा विकत घेतलेल आजार आहे त्यांनी आपले मार्गदर्शनातुन व्यसनमुक्त जगा आणि इतरांना जगु दया हा संदेश दिला तसेच जिवनमुल्य व प्रामाणीकता परत कशी आणायची याबाबत मार्गदर्शन केले.

वक्ते श्री तुषार नातु यांनी स्वतः व्यसनातुन बाहेर येवुन परत त्यांचेसारखे उध्वस्त झालेले आयुष्यांचे पुनरागमन करणे हा त्यांचा उद्देश असुन त्याकरिता काय करावे? याबाबत मार्गदर्शन केले. मैत्रि व्यसनमुक्ती केंद्र, हिंगणा रोड, नागपुर शहर मधील समन्वयक यांनी व्यसनामुळे जिवन कसे उध्वस्त होते व व्यसनाधिन व्यक्तीला व्यसनातुन बाहेर पडता येते हे आपले पथनाटयाचे माध्यमातुन सादर केले.

सदर कार्यक्रमांस एकुण 60_विवाहीत महीला व पुरुष (भरोसा सेल येथील तक्रारीतील अर्जदार व गैरअर्जदार), पोलीस आयुक्तालयातील व भरासा सेल येथील 30 अधिकारी व  कर्मचारी असे एकुण 90 आमंत्रित हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती छाया जोशी व आभारप्रदर्शन समुपदेषक श्रीमती सुनिता कोडापाल यांनी केले.

सदर कार्यक्रमाचे यशश्वी आयोजन मा. श्री निलेश भरणे, पोलीस उपायुक्त (गुन्हे प्रगटीकरण)यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती शुभदा संखे, पोलीस निरीक्षक, भरोसा सेल, भरोसा सेलचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच भरोसा सेल येथील कार्यरत समुपदेशक यांनी केले .










5) <u>शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–</u>

नागपूर शहरात आज दि. 15.03.2019 रोजी मा. सहा पोलीस आयुक्त, (वेलफेअर) श्रीमती भवरे, या नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर